**पिंपरी चिंचवड महानगरपालिका, पिंपरी - ४११०१८**
**मा.इ प्रभाग समिती**
**कार्यपत्रिका क्रमांक - १०**
**सभावृत्तांत**

**दिनांक - ०४/०१/२०१९** **वेळ -सकाळी ११. ०० वा.**

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या इ प्रभाग समितीची मासिक सभा शुक्रवार **दिनांक - ०४/०१/२०१९** रोजी **सकाळी ११. ०० वा.** इ प्रभाग कार्यालयाचे **"संत ज्ञानेश्वर महाराज"** सभागृहामध्ये आयोजीत करणेत आली होती. सदर सभेस खालीलप्रमाणे मा.नगरसदस्य उपस्थित होते.

१) मा.भिमाबाई पोपट फुगे – **अध्यक्षा**
२) मा.सुवर्णा विकास बुर्डे
३) मा.तापकीर विनया प्रदिप (आबा)
४) मा. श्री उंडे लक्ष्मण धोंडू
५) मा.गायकवाड निर्मला मनोज
६) मा.श्री.सागर बाळासाहेब गवळी
७) मा.Adv.नितीन ज्ञानेश्वर लांडगे
८) मा.बुर्डे अजित प्रताप - स्विकृत सदस्य
९) मा.श्रीम.साधना सचिन तापकीर - स्विकृत सदस्य
१०) मा.श्री.लांडे विजय नामदेव - स्विकृत सदस्य

तसेच खालीलप्रमाणे अधिकारी/कर्मचारी उपस्थित होते.

मा.श्री.श्रीनिवास दांगट - क्षेत्रीय अधिकारी, श्री.निकम मोहन-लेखाधिकारी, श्री. एस. एच. भोसले- प्र.प्रशासन अधिकारी, श्री.प्रविण घोडे- कार्यकारी अभियंता (विद्युत), श्री.संजय घुबे- कार्यकारी अभियंता (स्थापत्य), श्रीम.शिनकर पी.पी.उपअभियंता (स्थापत्य), श्री.बोरावके डी.एच.- उपअभियंता (स्थापत्य), श्री.लांडे बी.पी.-उपअभियंता (विद्युत), श्री.एस.एस.खडतरे – उपअभियंता (नगररचना), श्री.राजेंद्र शिंदे - उपअभियंता (स्थापत्य), श्री.विजय जाधव- उपअभियंता (स्थापत्य/उद्यान), श्री.गनबोटे ए.पी. - क.अभियंता (स्थापत्य) श्रीम.पोतदार व्ही.एच. - क.अभियंता (स्थापत्य), श्री.कातोरे पी.बी. - कनिष्ठ अभियंता (विद्युत), श्री.पवार व्ही.एस.- क.अभियंता(विद्युत), श्री. व्ही. एम. ताकवले - कनिष्ठ अभियंता (स्थापत्य), श्री.व्ही.जी.जगताप – स्था. अ.स.(पाणीपुरवठा), श्री.प्र.रा.तावरे – सहा.आरोग्य अधिकारी, श्री.ए.व्ही.गुमास्ते – प्र.मुख्य आरोग्य निरीक्षक, श्री.डामसे आर.पी.मलेरिया निरीक्षक, श्री.कोतकर पी.- क.अभियंता, (पाणीपुरवठा), श्री.कुतवळ एस.यु.-क.अभियंता, (ज.नि.), श्री.शेलार ए.बी. क.अभियंता (ज.नि.), श्री.निखील फेंडर- क.अभियंता स्थापत्य उद्यान, , श्री.कोंढरे- एस.आर. – अतिक्रमणपथक प्रमुख (अतिक्रमण), श्री.लांडगे एस.एन.मुख्यलिपिक (अतिकमण), श्री.गायकवाड पी.आर.-मुख्याध्यापक- माध्यमिक विद्यालय,लांडेवाडी, श्रीम.भोज – जे.एस. - क्रीडा पर्यवेक्षक.

------

**मा.अध्यक्षा –** सर्व सन्मा.सदस्य व सर्व सन्मा.अधिकारी यांचे स्वागत करुन सभेला सुरुवात करण्यात येत आहे.

**उपस्थित सन्मा.सदस्यांचे संमतीने खालील ऐनवेळचे विषय सभा कामकाजात दाखल करुन घेणेत आले.**

------

**विषय क्रमांक -१.** मौजे मोशी येथील पुणे-नाशिक रस्ता(गट क्र.४९) ते गट क्र.५० मिळकतीमध्ये महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम २०१३ कलम २०५ अन्वये रस्ता घोषीत करणेबाबत... मा. सौ.सुवर्णा विकास बुर्डे यांचे दिनांक ०४/०१/२०१९ चे पत्र.

**विषय क्रमांक -२**. स्वच्छ भारत अभियान २०१९ अंतर्गत इ प्रभाग समिती सदस्यांची राजस्थान दौ-यासाठी मान्यता मिळणेबाबत.मासभापती सौ.भिमाबाई पोपट फुगे यांचे दि.४/१/२०१९ चे पत्र.

-------

अ) दिनांक ०७/१२/२०१८ रोजी झालेल्या सभेचा (कार्यक्रमपत्रिका ९) सभावृत्तांत कायम करणेत आल्याचे मा.सभापती यांनी प्रकट केले.

------

**उपस्थित सन्मा.सदस्यांचे संमतीने खालील ऐनवेळचे विषय सभाकामकाजात दाखल करुन घेणेत आले.**

-----

ठराव क्रमांक - **३३** विषय क्रमांक- १

दिनांक- - **०४/०१/२०१९**

सूचक- मा.लक्ष्मण उंडे अनुमोदक–मा. सागर गवळी

संदर्भ - मौजे मोशी येथील पुणे-नाशिक रस्ता (गट क्र.४९) ते गट क्र.५०मिळकतीमध्ये महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम २०१३ कलम २०५ अन्वये रस्ता घोषीत करणेबाबत...

मा. सौ.सुवर्णा विकास बुर्डे यांचे दिनांक ०४/०१/२०१९ चे पत्र. मौजे मोशी येथील पुणे-नाशिक रस्ता (गट क्र.४९) ते गट क्र. ५० अस्तित्वातील रस्त्यावर नागरीकांचा वापर चालू आहे. सदर रस्ता वाहतुकीसाठी खूपच कमी पडत आहे. त्यामुळे सदरचा रस्ता १२.०० मी. रुंद रस्ता महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमाचे कलम २०५ अन्वये (म्युनिसिपल रोड) रस्ता घोषीत करणे आवश्यक आहे. तरी सदरचा रस्ता महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम २०१३ कलम २०५ अंतर्गत रस्ता घोषित करणेस मान्यता देण्यात येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला

------

ठराव क्रमांक - **३४** विषय क्रमांक- २

दिनांक- - **०४/०१/२०१९**

सूचक- मा. भिमाबाई पोपट फुगे अनुमोदक–मा. लक्ष्मण उंडे

संदर्भ - स्वच्छ भारत अभियान २०१९ अंतर्गत इ प्रभाग समिती सदस्यांची राजस्थान दौ-यास

शृपिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या इ प्रभाग समिती हे स्वच्छ भारत अभियान (कचरा निर्मुलन) २०१९ अंतर्गत सन्मा.सदस्य/सदस्या राजस्थान पाहणी दौरा व अभ्यास करण्यासाठी दिनांक २७/०१/२०१९ ते ३१/०१/२०१९ रोजी जाणार आहोत. त्या अनुषंगाने येणा-या संभाव्य र.रु.२,००,०००/- (अक्षरी र.रु.दोन लाख) खर्चास मान्यता देण्यात येत आहे.

**मा. अध्यक्षा -** यानंतर मा.अध्यक्षा यांनी सभा संपल्याचे जाहीर केले.

अध्यक्षा
इ प्रभाग समिती
भोसरी – ३९.

पिंपरी चिंचवड महानगरपालिका
इ क्षेत्रीय कार्यालय, भोसरी – ३९
क्र-इक्षेका/कावि/४/२०/२०१९
दिनांक- १५/०१/२०१९.

प्रशासन अधिकारी तथा सचिव
इ क्षेत्रीय कार्यालय
भोसरी – ३९.

प्रत- सर्व संबंधित शाखाप्रमुख व शाखाधिकारी

सभावृत्तांतील ठरावानुसार आपले विभागाशी संबंधित विषयाबाबत योग्य ती नियमाधिन कार्यवाही करणेत यावी. याबाबत वेगळा पत्रव्यवहार केला जाणार नाही याची नोंद घ्यावी.
पुढील योग्य त्या कार्यवाहीसाठी रवाना.

**शुक्रवार दिनांक ०४/०१/२०१९ सकाळी ११.०० वा. इ प्रभाग समितीची मासिक सभा झाली. सभेत खालीलप्रमाणे मा.नगरसदस्यांनी चर्चा केली.**

**मा.सागर गवळी –** सर्व सन्मा.सदस्य व सर्व सन्मा.अधिकारी सर्वांना नवीन वर्षाच्या हार्दिक शुभेच्छा तसेच विद्युत विभागाचे कार्यकारी अभियंता प्रविण घोडे साहेब यांना वाढदिवसाच्या शुभेच्छा. नवीन वर्षामध्ये सर्वांनी चांगली कामे करणे.

**मा.सभापती सौ.भिमाताई पोपट फुगे -** सर्व सन्मा.सदस्य व सर्व सन्मा.अधिकारी सर्वांना नवीन वर्षाच्या हार्दिक शुभेच्छा तसेच विद्युत विभागाचे कार्यकारी अभियंता प्रविण घोडे साहेब यांना वाढदिवसाच्या शुभेच्छा.

**मा.क्षेत्रीय अधिकारी -** सर्व सन्मा.सदस्य व सर्व सन्मा.अधिकारी सर्वांना नवीन वर्षाच्या हार्दिक शुभेच्छा तसेच विद्युत विभागाचे कार्यकारी अभियंता प्रविण घोडे साहेब यांना वाढदिवसाच्या शुभेच्छा. तसेच ४ जानेवारी २०१९ पासून स्वच्छ सर्वेक्षण २०१९ चालू होत आहे त्याबाबत सहा. आरोग्य अधिकारी तावरे साहेब माहिती देतील.

**मा.लक्ष्मण उंडे -** सर्व सन्मा.सदस्य व सर्व सन्मा.अधिकारी सर्वांना नवीन वर्षाच्या हार्दिक शुभेच्छा तसेच विद्युत विभागाचे कार्यकारी अभियंता प्रविण घोडे साहेब यांना वाढदिवसाच्या शुभेच्छा.

**मा.अजित बुर्डे – स्विकृत सदस्य -** सर्व सन्मा.सदस्य व सर्व सन्मा.अधिकारी सर्वांना नवीन वर्षाच्या हार्दिक शुभेच्छा. मा.सागर गवळी, नगरसदस्य यांचा २ जानेवारीला वाढदिवस झाला त्यांना वाढदिवसाच्या शुभेच्छा. तसेच विद्युत विभागाचे कार्यकारी अभियंता प्रविण घोडे साहेब यांना वाढदिवसाच्या शुभेच्छा.

**मा.साधना तापकीर –स्विकृत सदस्या -** सर्व सन्मा.सदस्य व सर्व सन्मा.अधिकारी सर्वांना नवीन वर्षाच्या हार्दिक शुभेच्छा तसेच विद्युत विभागाचे कार्यकारी अभियंता प्रविण घोडे साहेब यांना वाढदिवसाच्या शुभेच्छा.

**श्री.प्रभाकर तावरे –(सहा.आरोग्याधिकारी)** – ४ जानेवारी २०१९ पासून स्वच्छ सर्वेक्षण २०१९ चालू होत आहे. सर्वत्र नागरीकांनी टाकलेला केरकचरा उचलला जात आहे. वेळोवेळी कच-याचे ढीग उचलले जातात.खाजगी संस्थेचे कर्मचारी ऍप डाऊनलोड करुन देत आहे. त्यानंतर ऍपवर आलेल्या तक्रारीचे निराकरण आरोग्य निरीक्षक करणार आहेत. तक्रारी निवारण होणार आहेत. नागरीकांमध्ये जनजागृती झाली पाहिजे. सगळीकडे होर्डींग लावणार आहेत. आपल्याला स्वच्छ सर्वेक्षण कक्षातून फोन येणार आहेत. त्यामध्ये सात प्रकारचे प्रश्न विचारले जाणार आहेत. सर्वांनी उत्तरे दयायची आहे. शहरामध्ये स्वच्छ सर्वेक्षण आहे का? अशाप्रकारे प्रश्न विचारले जातील. जनजागृती होणे गरजेचे आहे. आरोग्य विभागाकडून प्रयत्न चालू आहेत. रेडिओवर रेडिओ मिरचीचॅनेलवर जाहिरात चालू आहे. सध्या टॉयलेटमध्ये आरसा, वॉश बेसिण व साबण ठेवण्यात येतील. लोकांना चांगली सवय लागली पाहिजे. स्वच्छ सर्वेक्षणाच्या बाबत सगळया विभागांनी सहकार्य केले पाहिजे. लोकांनी चांगला वापर केला पाहिजे. आपलेकडे स्वच्छ सर्वेक्षणची टीम येणार आहे. टॉयलेटमध्ये रात्री लाईट पाहिजे. नागरीक नळाचे कॉक काढून घेतात. चोरीचे प्रकार खूप होतात. त्यामुळे केअर टेकर त्या ठिकाणी असतील तर चोरी होणार नाही. दिघी, बोपखेल, मोशी व च-होली येथे स्वच्छ सर्वेक्षण होईल. प्रादुर्भाव कमी करण्याच्या दृष्टीने सर्वांनी सहकार्य केले पाहिजे. आपले सर्वांचेच योगदान महत्वाचे आहे.

**मा.सागर गवळी -** भोसरी येथील साईपार्क रस्त्याचे काम चालू आहे. डांबर टाकुन काम सुरु करा. या आठवडयात सगळे काम झाले पाहिजे. एलइडी लाईटचे काम सगळीकडे झाले पाहिजे. फाऊंडेशनचे काम करुन त्या ठिकाणी नवीन खांब लागले पाहिजे. ड्रेनेजचे काम झाले पाहिजे. पाणीपुरवठा व्यवस्थित झाला पाहिजे. याबाबत प्रामुख्याने लक्ष दिले पाहिजे. पाणीपुरवठा व ड्रेनेजबाबत मिटींग घेण्यात येईल.

**मा.सभापती सौ.भिमाताई पोपट फुगे-** ठेकेदाराचे लोक ड्रेनेजचे काम करतात पण पैसे मागतात. माझेकडे तक्रार केली आहे. आमचे कॉलनीमध्ये एकदा १३००/- रुपये मागितले होते. तसेच ३०००/- रुपये मागितले होते.

**श्री.गवळी धनंजय (उपअभियंता जलनि:सारण) -** ते बाहेरचे लोक होते. ठेकेदार फोन करुन त्यांना बोलावून घेतात. व ते लोक ड्रेनेजचे काम करतात.

**मा.सागर गवळी -** आपले लोक ड्रेनेजचे काम व्यवस्थित करीत नाही. सर्व प्रभागातील ड्रेनेजचे काम व्यवस्थित झाले पाहिजे.

**मा.सभापती सौ.भिमाताई पोपट फुगे -** सर्व प्रभागातील ड्रेनेजचे काम व्यवस्थित झाले पाहिजे. जी काही यंत्रणा लागेल ती सर्व उपलब्ध करुन देण्यात यावी. कच-याच्या गाडया वाढविल्या पाहिजे. एकच कच-याची गाडी येत असते. खूप दिवसापासून खंडोबामाळचे काम रखडले आहे.

**मा.लक्ष्मण उंडे –** कचरा नेणा-या गाडया वाढविल्या पाहिजे. त्याबाबत काही तरी पॉलीसी करा परंतू कच-याच्या गाडया वाढविल्या पाहिजे.

**मा.अजित बुर्डे (स्विकृत सदस्य) –** मागचे वेळेस सुध्दा च-होली गावठाण येथील ओला कच-याबाबत सांगितले होते. परंतू ओल्या कच-याचे काहीही काम होत नाही. संबंधीत कर्मचा-यांना नोटीसा देण्यात याव्यात. सीटी सर्वेचे जे रस्ते आहेत ते छोटे व्हायला लागले आहेत. तेथे लोकवस्ती वाढली आहे. दोन फुटाने रस्ते कमी झाले आहे. रस्ते सगळे मोजून घ्यावे. प्रत्येकाचे बांधकाम २,३ फुटाने पुढे आले आहे. केबल ब्लॉक आहे तसेच ठेवले आहे. सगळे ब्लॉक उघडे पडले आहे. रस्त्यावरील पोल व्यवस्थित करणे.

**मा.सागर गवळी -** स्थापत्य विषयक कामे वेळेवर झाली पाहिजे. एक वर्षापासून पाणी आणि ड्रेनेजचे काम झाले नाही. नवीन ड्रेनेजलाईन टाकणे. दर्शनकॉलनी, आदर्शनगर या ठिकाणी कच-याची गाडी आली नाही. कच-याचे योग्य पध्दतीने नियोजन करणे. टॉप टेनमध्ये पीसीएमसी आली पाहिजे. शौचालयाची सर्व कामे करणार आहे का?

**श्री.प्रभाकर तावरे –(सहा.आरोग्याधिकारी) –** रेडझोनमध्ये शौचालयाची कामे करण्यासाठी शासनाचे अनुदान मिळत नाही.

**मा.सागर गवळी –** शास्त्रीचौकाचे पुढे झोपडपट्टी आहे. तेथे नंदीलोक राहतात. त्यांची दोनशे, तीनशे झोपडे आहेत. त्यांचेसाठी शौचालयाची व्यवस्था करण्यात आली आहे का?

**श्री.प्रभाकर तावरे –(सहा.आरोग्याधिकारी) –** त्यांचेसाठी शौचालयाची सोय केली नाही.जागामालकांनी त्यांची शौचालयाची सोय करावी.

**मा.सागर गवळी –** तेथील झोपडपट्टी घोषीत करणे. झोनिपू विभागाला एक पत्र पाठवून झोपडपट्टी घोषित करा. महापालिकेच्या ताब्यात घ्या. तेथील लोक कुठेही पाणी भरतात. त्यांचा पाण्याचा प्रश्न कसा मार्गी लागेल? त्यांचे स्वच्छ भारत अभियानमध्ये कसे होणार?

**मा.सभापती सौ.भिमाताई पोपट फुगे-** चौकामध्ये भाजीवाले बसतात त्यांना नोटीस दया.

**मा.क्षेत्रीय अधिकारी –** चौकामध्ये भाजीवाले, फळवाले बसतात आपण त्यांना पत्र देतो.

**मा.सागर गवळी** – स्वच्छ भारत अभियानमध्ये काही मदत लागली तर आम्ही ती मदत करण्यासाठी तयार आहोत. फक्त पिण्याचे पाणी, ड्रेनेज, रस्ते या कामकाजावर जास्त भर देण्यात यावा.

**मा.निर्मला गायकवाड -** दिघीमध्ये कच-याच्या गाडया येत नाही. ममता चौक दिघी येथील अतिक्रमण बाबत कार्यवाही होत नाही. दिघीमध्ये एक व्हीजीट घ्या. मॅग्झीन चौकापासून दिघी जकातनाक्यापर्यंत अतिक्रमणबाबत कार्यवाही करणे.

**श्री.कोंढरे- एस.आर. – अतिक्रमणपथक प्रमुख (अतिक्रमण) -** अतिक्रमण बाबत आम्ही संयुक्त कार्यवाही करतो.

**मा.लक्ष्मण उंडे -** अतिक्रमण कार्यवाहीची व्यवस्थित नोंद घ्या. टपरीवाले, भाजीवाले तसेच इतर विक्रेते बसतात त्यांचेवर कार्यवाही करणे.

**मा. निर्मला गायकवाड -** नगररचना विभागाने स.नं.२ जागा ताब्यात घेणेसाठी पाठपुरावा करावा.

**श्री.एस.एस.खडतरे – उपअभियंता (नगररचना)-** कलेक्टर ऑफीसमधून पत्र आले आहे. भूसंपादन ऑफीसचे येत्या आठ तारखेला कॅम्प येणार आहे. मंजूरी मिळाली आहे.

**मा.सागर गवळी** – भोसरी दिघी शिवेचा रस्त्याबाबत लोकांना नोटीसा गेल्या आहेत. सगळया लोकांचे नोटीसा आलेबाबत फोन आले आहेत. आपल्याला नियमानुसार काय करता येईल ते केले पाहिजे. भोसरी दिघी शिवेवरचा रस्ता करणे गरजेचे आहे.

**श्री.एस.एस.खडतरे – उपअभियंता (नगररचना)-** १२ मीटरचा रस्ता आहे त्याचा भूसंपादन विभागाला प्रस्ताव ठेवला आहे. तेथील लोक तयार आहेत.

**मा.सागर गवळी** – जागा ताब्यात आली आहे त्या जागेवर डांबर टाकणे. डांबरीकरण करुन रस्त्याचे नियोजन करणे. प्रत्येकाचे घरी जाणे. १५ दिवसापुर्वी नोटीसा गेलेल्या आहेत. आठ तारखेला कॅम्प लावा. जो रस्ता ताब्यात आला त्याठिकाणी डांबर टाकणे. लोकांचे नुकसान करायचे नाही. त्यांना मोबदला कसा देता येईल हे महत्वाचे आहे. शिवेवरच्या रस्त्याचे काम प्रथम झाले पाहिजे. दिघीरोडला फळवाले, भाजीवाले बसतात तसेच ज्ञानदिप शाळा, प्रियदर्शनी शाळा, सिध्देश्वर शाळा या ठिकाणी अतिक्रमणची कार्यवाही करण्यात यावी. रस्त्यावर कोणीही काही विकायचे नाही. त्या ठिकाणी अतिक्रमणची कार्यवाही झालीच पाहिजे. पाण्याच्या टाकीजवळचे अतिक्रमण मार्गी लावले पाहिजे. अपघात झाले तर त्याला जबाबदार कोण? हॉकर्सझोन फायनल करा. आळंदीरोडला अतिक्रमण आहे ते सुध्दा हटविले पाहिजे. विशेषत: शाळेजवळील सर्व अतिक्रमण हटविले पाहिजे.

मा.अध्यक्षा यांनी सर्वांचे आभार मानून सभा संपल्याचे जाहीर केले.

**-------**